सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : १९४ | सोमवार, दि. ६ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## ग्राहकांनो, आता रांगेत थांबूच नका, सुरक्षितपणे घरपोच सिलिंडर मिळणार

### जळगाव जिल्हा प्रशासनाने अवलंबिले साठेबाजीसह पॅनिक बुकिंग रोखण्यासाठी कठोर धोरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आंतरराष्ट्रीय पातळीवर निर्माण झालेल्या इंधन पुरवठा अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा प्रशासनाने घरगुती गॅस सिलिंडर वितरणाबाबत अधिक कठोर धोरण अवलंबिले आहे. भारत पेट्रोलियम (बीपीसीएल), इंडियन ऑईल (आयओसीएल) आणि हिंदुस्थान पेट्रोलियम (एचपीसीएल) या सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांच्या स्थानिक अधिकाऱ्यांना लेखी सूचना पाठविण्यात आल्या आहेत.

मध्य आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत इंधन पुरवठ्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. याचा संभाव्य परिणाम देशांतर्गत पुरवठ्यावर होऊ शकतो. या शक्यतेमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी ग्राहकांकडून पॅनिक बुकिंग वाढण्याची तसेच घरगुती गॅस सिलिंडरचा अनावश्यक साठा करण्याचे प्रकार घडण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे, की काही गॅस एजन्सींकडून नियमांचे उल्लंघन करून कार्यालय किंवा गोदामातून थेट सिलिंडरचे वितरण केले जात आहे. या प्रकारामुळे एजन्सीच्या परिसरात ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, त्यातून सुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. आग किंवा इतर अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने हा निर्णय अधिक कडकपणे लागू करण्याचे ठरविले आहे. गॅस वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी प्रशासनाने काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.




## नवीन स्मशानभूमीचे काम अखेर सुरू

### आता शहरवासीयांची गैरसोय होणार दूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील चोपडा रोडवरील पैलाड व ताडेपुरा भागासाठीच्या नवीन स्मशानभूमीचे काम अखेर पालिकेकडून सुरू झाले आहे. यामध्ये आता नव्याने दाहिन्यांचे ओटे, छत उभारले जात असल्याने या भागातील नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

येथील पालिकेंतर्गत पैलाड व ताडेपुरा भागासाठीची नवीन स्मशानभूमी ८० टक्के बांधण्यात आली आहे. जुन्या स्मशानभूमीतील दाहिन्यांचे तिन्ही ओटे तुटलेले असल्याने अक्षरशः जमिनीवरच अंत्यसंस्कार करावे लागत होते. त्यामुळे मोठी गैरसोय होत होती. दरम्यान, सदर नव्या स्मशानभूमी कामाच्या खर्चाचे बिल जिल्हास्तरावरून प्राप्त झालेले होते. परंतु ऑडिट अपूर्ण असल्याने पालिका ठेकेदाराला बिल अदा करत नव्हती आणि ठेकेदारही काम पूर्ण करण्यास तयार नव्हता. त्यामुळे मृतदेहाची विटंबना होऊन संबंधित परिवारातील सदस्य व नातेवाईकांच्या भावना दुखावल्या जात होत्या. याबाबत प्रसिद्धीमाध्यमांनी पालिकेतील सत्ताधारी आणि विरोधक यांनी राजकारण विसरून काम पूर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे, असे आवाहन केले होते. त्यावरून पालिकेने संबंधित ठेकेदाराला काम पूर्ण करण्याबाबत नोटिसा बजावल्या होत्या. अखेर ठेकेदाराने या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत मृतदेहाची विटंबना होऊ नये म्हणून माणुसकी जपत कामाला सुरूवात केली आहे.



*अमळनेर : पैलाड, ताडेपुरा भागातील नागरिकांची गैरसोय दूर करण्याच्या उद्देशातून पालिकेतर्फे सुरू असलेले नवीन स्मशानभूमीचे काम.*

> **पैलाड, ताडेपुरासह शहरातील जनतेच्या भावनांशी खेळणे योग्य नव्हते. बिल मिळण्यापेक्षा जनहित महत्त्वाचे आहे. मृतदेहाची विटंबना अथवा अवहेलना होऊ नये, यासाठी काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर काम लवकर पूर्ण होऊन नागरिकांची गैरसोय दूर होईल.**
> **– मिहीर हेमंत पवार, ठेकेदार**

## इशारा दर्शक फलक नसल्याने गतिरोधक ठरताहेत जीवघेणे

### अपघात टाळण्यासाठी फलकांसह गतिरोधकांवर पांढरे-काळे पट्ट्यांसह पेंट लावणे गरजेचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरासह शहराबाहेर जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवरील एकाही गतिरोधकावर पांढरे-काळे पट्टे आखलेले नसल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. प्रशासनाकडून होणाऱ्या या दुर्लक्षामुळे अक्षरशः नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची भावना वाहनचालकांसह नागरिकांकडून व्यक्त होत आहे. किंबहुना अपघात टाळण्यासाठी उभारलेले गतिरोधकच आता अपघातांचे कारण ठरत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने ही बाब गंभीरतेने घेऊन तत्परतेने गतिरोधकांवर पांढरे-काळे पट्टे आखून त्यावर ल्युमिनस पेंट लावण्यात यावा, तसेच गतिरोधक येण्यापूर्वी काही अंतरावर इशारा देणारे फलक लावले जावेत, अशी मागणी वाहनचालकांसह शहरातील नागरिकांकडून होत आहे.



विशेषतः रात्रीच्या वेळी आणि हे गतिरोधक वाहनचालकांना अजिबात दिसत नसल्याने तसेच त्या ठिकाणी कुठेही इशारा दर्शक फलक नाहीत. त्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. दुचाकीस्वारांना अचानक धक्का बसून तोल जाण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत, तर चारचाकी वाहनांनाही काहीना काही नुकसान सहन करावे लागत आहे.

शहरातील गलवाडे रस्त्यावर यापूर्वी गतिरोधक नसल्यामुळे एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर प्रशासनाने तेथे गतिरोधक उभारले. मात्र, त्यावर कोणतेही पांढरे-काळे पट्टे अथवा योग्य चिन्हांकन न केल्याने आणखी एक दुर्घटना घडली. मुडी येथील एका महिलेचा गतिरोधकावर आदळून मृत्यू झाल्याची घटनाही समोर आली आहे. त्यामुळे गतिरोधक असो वा नसो, धोका मात्र कायमच, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.

इंडियन रोड्स काँग्रेसच्या (आयआरसी) नियमानुसार प्रत्येक गतिरोधकावर पांढरे किंवा पिवळे झेब्रा पट्टे रंगविणे, योग्य उंची राखणे आणि इशारा दर्शक फलक लावणे बंधनकारक आहे. मात्र, अमळनेरमध्ये या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, संबंधित प्रशासनाने शहरातील अथवा शहराबाहेर जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवरील गतिरोधकांवर पांढरे पट्टे रंगवून, उंची नियमानुसार करून आणि आवश्यक ते इशारा दर्शक फलक लावून उपाययोजना करावी. रस्ते सुरक्षेच्या नावाखाली उभारलेले हे गतिरोधकच जर जीवघेणे ठरत असतील, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्नही आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



*अमळनेर : शहरातील ढेकू रोडवरील जय योगेश्वर कॉलनीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालेले चोरटे.*

## अमळनेरात ढेकू रोडवर घरफोडी; दागिन्यांसह रोकड केली लंपास

### चोरटे जय योगेश्वर कॉलनीतील सीसीटीव्हीत कैद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील ढेकू रोडवरील जय योगेश्वर कॉलनीतील कुटुंब पुण्याला गेल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी घराचा कडी-कोयंडा तोडून रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा सुमारे ६४ हजार रुपयांचा मुद्देमाल तसेच तांबे, पितळ आणि कास्याची भांडी लंपास केली. ही घटना शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी घडली.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की ढेकू रोडवरील जय योगेश्वर कॉलनीतील रहिवासी वैशालीताई चंद्रकांत वाघ या १४ मार्च २०२६ पासून मुलाकडे पुण्याला गेलेल्या होत्या. याच दरम्यान शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी मुलाच्या मित्राने सांगितले, की तुमच्या घराचा कडी-कोयंडा तोडलेला दिसून येत आहे. तेव्हा दुसऱ्या मित्रांनी घरी जाऊन खात्री केली असता कपाट उघडून साहित्य अस्ताव्यस्त फेकलेले दिसून आले. त्यामुळे वैशालीताई रविवार, दि. ५ एप्रिल रोजी सकाळीच पुण्याहून अमळनेर येथे आल्या. तेव्हा त्यांना घरातील कपाटाचे कुलूपही तोडलेले आढळून आले. यात कपाटातील ३० हजार रुपयांच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, १२ हजार रुपये किमतीच्या चार अंगठ्या, १० हजार रुपये किमतीचे ३० भार चांदीचे दागिने व १२ हजार

पान २ वर

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका

## राष्ट्रवादी काँग्रेस स्वबळावर लढविणार

### जळगाव जिल्हा निरीक्षक काळेंची कार्यकर्त्यांच्या बैठकीत घोषणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लवकरच होतील. या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) स्वबळावर लढवेल. त्या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी आतापासूनच तयारीला लागावे, अशी सूचना जळगाव जिल्हा निरीक्षक भास्करराव काळे यांनी केली.





*अमळनेर : तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे (शरदचंद्र पवार गट) शिव पेट्रोलियमजवळील पक्ष कार्यालयात शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना जळगाव जिल्हा निरीक्षक भास्करराव काळे. शेजारी प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अशोक पवार, इंजि. दिनकर पाटील, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम आदी.*

येथील तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे (शरदचंद्र पवार गट) शिव पेट्रोलियमजवळील पक्ष कार्यालयात शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी आयोजित कार्यकर्त्यांच्या बैठकीत ते बोलत होते. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. बी. एस. पाटील बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रा. अशोक पवार, इंजि. दिनकर पाटील, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश पगारे, मनोहर नाना निकम, महिला तालुकाध्यक्षा योजना पाटील, महिला जिल्हा उपाध्यक्षा कविता पवार, युवक तालुकाध्यक्ष योगेश शिसोदे, शहर कार्याध्यक्ष जाकीर शेख, किसान सेलचे अध्यक्ष मनोहर पाटील आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री. काळे म्हणाले, की पक्षातर्फे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका स्वबळावर लढविल्या जातील. इच्छुक कार्यकर्त्यांनी आतापासूनच तयारीला लागावे. यात तालुक्यात प्रत्येक गटनिहाय मेळावे आयोजित करावे. पक्ष नेहमीच कार्यकर्त्यांच्या पाठीशी उभा राहत आला आहे. तो यापुढेही राहील. यावेळी ‘व्हॉइस ऑफ मीडिया’चे पत्रकार ईश्वर महाजन यांना राज्यस्तरीय पॉझिटिव्ह जर्नलिझम पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पक्षातर्फे त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. तालुकाध्यक्ष डी. एम. पाटील यांनी प्रास्ताविक केले. दयाराम पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत निकम यांनी आभार मानले.

आजचे अभीष्टचिंतन



सौ. राजश्रीताई पाटील
अमळनेर



श्री. योगेश कोठारी
अमळनेर



डॉ. प्रसन्ना जोशी
अमळनेर



श्री. अतुल महाजन
संचालक : पप्पूज आईस्क्रीम, अमळनेर

### दिनविशेष

०६ एप्रिल

- शिवाजी महाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला.
- गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.
- भारतीय जलतरणपटू मिहिर सेनने भारत आणि पाकिस्तानला जोडणारी पाल्क सामुद्रधुनी ओलांडली.
- भारतीय जनता पक्षाची (भाजप) स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी पहिले अध्यक्ष झाले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

**दत्तशिखर देवस्थानचे ३१ वे महंत मधुसूदनजी महाराज यांचे निधन**

–पान २ वर

## संपादकीय

# अंजनीसुत हनुमानजी रामभक्तीचा प्राण

लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा, पुरातना, पुण्यवंता पुण्यशीला पावना परितोषिका अशा शब्दांत समर्थ रामदासांनी हनुमानजींची अर्थात मारुतीरायांची स्तुती केली आहे. नुकतीच देशभर हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी झाली. गेल्या काही वर्षांत भारतात श्रीरामभक्तीची मोठी लाट आल्याचे चित्र पाहावयास मिळते. श्रीराम मंदिराच्या आंदोलनापासून ते श्रीराम मंदिराच्या पुनर्निर्माणापर्यंत असा जवळपास तीस-चाळीस वर्षांचा कालावधी श्रीरामभक्तीने ओतप्रोत भरल्यासारखे वातावरण निर्माण झाले. सर्वगुणसंपन्न श्रीराम आणि म्हणून त्यांची तितक्याच प्रकर्षाने केली जाणारी भक्ती ही जितकी महत्त्वाची आहे तितकीच श्रीरामांचा अनन्यभक्त असलेल्या हनुमानजींचीही भक्ती आवश्यक ठरते. अजूनही अनेकांचा यावर विश्वास बसत नाही की हनुमानजी जरी श्रीरामांचे दास असले तरी श्रीराम स्वत: हनुमानजींचे भक्त होते. खरेतर आपल्या महाराष्ट्रातील अनेक संतांनी परमेश्वराच्या भक्तीची महती सांगताना हे बऱ्याच अभंगांमधून स्पष्ट केले आहे, की ईश्वर हा भक्ताधीन असतो. जे लोक अखंड साधना करतात, भक्ती करतात, नामस्मरण करतात किंवा ज्यांना प्रपंच करता-करता परमेश्वरच अधिक महत्त्वाचा वाटत असतो. आपल्या प्रपंच किंवा व्यवसायाचा सगळा भार परमेश्वरावर टाकतात. आपण करीत असलेल्या प्रयत्नांना यश द्यायचे की नाही याचा निर्णय ते भगवंतावर सोडून देतात. प्रयत्नांमध्ये कोणतीही कसर सोडत नाहीत. परंतु ईश्वराच्या स्मरणाने केलेले कार्य हे कधीही वाया जात नाही. हा भारतीय संस्कृतीतील ऋषी-मुनींपासून ते आताच्या संत-महात्म्यांपर्यंत अनेकांचा अनुभव आहे. म्हणूनच ज्यावेळेला भक्ती कशी करावी याची उदाहरणे दिली जातात. त्यावेळेला ती हनुमानजींसारखी असावी असेच एकमेव उत्तर देता येते. या भक्तीचे मर्म आणि रहस्य म्हणजेच हनुमंतजी आहेत. ज्यांच्याकडे सर्व प्रकारची शक्ती होती. बुद्धिमत्ता होती. म्हणजेच सर्वगुण आणि शक्तीसंपन्न असूनही ज्या हनुमंतजींनी श्रीरामांच्या चरणी पूर्ण लोटांगण घातले होते. श्रीरामांशिवाय त्यांच्या मनात किंवा हृदयात कुठलाही विचार नसायचा.

प्रभू श्रीरामांनाही हनुमंतजी हेच सर्वाधिक लोकप्रिय भक्त वाटत होते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सर्व प्रकारची गुणवत्ता, पात्रता असतानाही कोणत्याही प्रकारचा गर्व किंवा अहंकार हनुमानजींकडे नव्हता. प्रत्यक्ष प्रभू श्रीरामांचे पूर्ण अभय किंवा वरदान त्यांना प्राप्त झाले होते आणि नम्रतेने हनुमंतजींनी श्रीरामांची सेवा केली. एवढेच नव्हे तर अडीअडचणीच्या काळात महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी प्रभू श्रीरामांनी हनुमंतजींना सल्ले विचारले होते. वाल्मिकी रामायणाच्या किश्किंधा कांडामध्ये हनुमानजींच्या जन्माचा उल्लेख येतो. मुळातच अंजनीसुत, वायुपुत्र किंवा पवनपुत्र असलेले हनुमानजी म्हणजेच अनेक बाबतीत ते वेगवान होते. वायू हा प्राणासमान मानला जातो आणि म्हणूनच हे वायुपुत्र हनुमानजीसुद्धा श्रीरामभक्तीचेच प्राण मानला गेले. स्वत:कडे थोडी जरी विद्वत्ता, शक्ती, आर्थिक सुबत्ता, सत्ता किंवा अधिकार जरी आला तरी मनुष्य त्याचा गर्व करायला लागतो. इतरांना तुच्छ लेखण्याची मनोवृत्ती आकाराला येते. परंतु हनुमानजींच्या गुणसंपदेमध्ये सर्व प्रकारच्या शक्ती असूनदेखील हनुमानजी किती नम्रपणे वागत होते हे जर लक्षात घेतले तर मुळातच नम्र असलेल्या श्रीरामांनासुद्धा हनुमानजी प्रिय होणे तितकेच स्वाभाविक ठरते. अशीही कथा सांगितली जाते, की माता सीता यांच्या अपहरणाच्या काळात ज्यावेळी वानरसेना सेतू बांधण्याचे काम करत होती त्यावेळी छोटीशी खार समुद्रात ओली होऊन यायची किनाऱ्यावर येऊन आपल्या अंगाला वाळू चिकटवायची आणि ती वाळू समुद्रात टाकून यायची ही बाब हनुमानजींच्या लक्षात येते. ते श्रीरामांना सांगतात. ही खारूताई आपल्याला सेतू बांधायला मदत करते आहे. श्रीराम म्हणतात, की तिला बोलवून आण, हनुमानजी बोलवायला जातात. ती म्हणते मला वेळ नाही, भरपूर कामे आहेत. परंतु हनुमानजी तिला श्रीरामांकडे घेऊन येतात. श्रीराम तिच्या पाठीवरून हात फिरवतात आणि तेच खारीच्या पाठीवर उमटलेली श्रीरामांची बोटे आहेत, असे सांगितले जाते. परंतु इतक्या शक्तीमान हनुमानजींचे अत्यंत छोट्या अशा खारूताईकडे लक्ष जाणे आणि तिच्या प्रयत्नांचे त्याने कौतुक करणे यामध्येच भक्त होण्यासाठी अशा प्रकारची नम्रता आणि छोट्यातील छोट्या गोष्टींचे महत्त्व ओळखण्याची बुद्धी असावी लागते.

हनुमानजींचा जन्मोत्सव साजरा करताना हनुमानजींची रामभक्ती ही शक्तीसंपन्नता असूनही नम्रता शिकविणारी ठरते. किंबहुना त्याच हनुमंतजींच्या आराधनेतून बलसंपन्नता आणि बुद्धीसंपन्नताही एकाचवेळी प्राप्त करता येते. म्हणूनच समर्थ रामदासांनी श्रीरामांची भक्ती करताना हनुमंतजींचा आदर्श स्वत:समोर ठेवला होता. म्हणूनच त्यांना त्यांनी लोकनाथा, जगन्नाथा, प्राणनाथा, पुरातना अशा प्रकारची सार्थ बिरूदावली त्याच्याविषयी व्यक्त केली होती. समाजाला श्रीरामांची भक्ती करायची असेल तर बुद्धीसंपन्न आणि बलसंपन्न व्हावे लागेल, यासाठीच त्यांनी महाराष्ट्रात अकरा मारुतींची स्थापना केली होती. समर्थ रामदासांचा जन्मदेखील श्रीराम नवमीच्याच दिवशी झाला होता. आणि अशा एक श्रीरामभक्ताने हनुमंतजींची आराधना करून भगवंताचे दास होऊनच राहिले पाहिजे अशा प्रकारचा कायमस्वरूपी संस्कार आपणा सर्वांना दिलेला आहे. आजच्या काळात हनुमंतजींचा आदर्श ठेवूनच कोणत्याही प्रकारची भक्ती करता आली पाहिजे. अहंकार, गर्व न बाळगता आणि लहानातल्या लहान गोष्टींकडे तितक्याच सहजतेने पाहण्याची सवय लावून घेतली पाहिजे. खरेतर ज्यांना श्रीरामांचे जीवन समजून घ्यायचे आहे त्यांनी सर्वप्रथम हनुमानजी समजून घेतले पाहिजे. त्यांच्यातील गुणवत्ता, बुद्धीमत्ता आचरणात आणता आली तर भक्तीसंपन्नता आपोआप प्राप्त होऊ शकते.

# अमळनेरचा यात्रोत्सव : भक्ती, मनोरंजन आणि जिव्हाळ्याचा अनोखा संगम

अमळनेरची ऐतिहासिक आणि आध्यात्मिक यात्रा म्हणजे खानदेशच्या सांस्कृतिक वैभवाचा एक सुवर्णकणच आहे. या यात्रेचे स्वरूप, परंपरा आणि उत्साह शब्दबद्ध सहज शक्य होणारे नाही इतके पैलू या यात्रोत्सवाला आहेत.

संतश्री सखाराम महाराज यांचा यात्रोत्सव असलेली ही यात्रा भक्ती, आनंद आणि परंपरेच्या वाळवंटातील सोहळाच आहे. म्हणून महाराष्ट्रातील यात्रांच्या परंपरेत अमळनेरच्या यात्रेचे स्थान अढळ आहे. रणरणत्या उन्हात, बोरी नदीच्या विस्तीर्ण पात्रात (वाळवंटात) भरणारी ही यात्रा केवळ एक बाजार नसून तो भक्ती, मनोरंजन आणि कौटुंबिक जिव्हाळ्याचा अनोखा संगम आहे. हिवाळ्यापासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्रातील यात्रांचा समारोप अमळनेरच्या या यात्रेने होतो. कारण यानंतर पावसाळ्याची चाहूल लागते.

मोठा आध्यात्मिक वारसा आणि इतिहास देखील या यात्रेस आहे. या यात्रेचा केंद्रबिंदू म्हणजे संतश्री सखाराम महाराज. विठ्ठलाचे परमभक्त असलेल्या महाराजांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही यात्रा भरते. पंढरीच्या वारीला जाण्यापूर्वी तत्कालीन संतश्री सखाराम महाराज आपल्या कुटीला अग्नी लावून मार्गस्थ होत असत, या त्यागाची आणि भक्तीची आठवण आजही या सोहळ्यात जपली जाते.

अक्षय्य तृतीयेला नदीपात्रातील समाधीसमोर स्तंभारोपणाने यात्रेचा श्रीगणेशा होतो. पंढरपूरच्या विठोबाचे प्रतिनिधी म्हणून बेलापूरकर महाराजांचे आगमन हा या यात्रेचा सर्वांत महत्त्वाचा क्षण. त्यांचे स्वागत करण्यासाठी गादीपती प. पू. संतश्री सद्गुरू प्रसाद महाराज आणि अमळनेरकर भाविक वेशीपर्यंत जातात. येथून पुढे कीर्तन, प्रवचन आणि हरिपाठाची एक आध्यात्मिक मेजवानीच रसिकांना मिळते.

मनोवेधक असा रथोत्सव आणि सोहळा अनुभवताना आनंदाला उधाण येते. एकादशीच्या पहाटे वाडी चौकातील मंदिरातून निघालेला, लालजींच्या मूर्तीने सजलेला भव्य रथ सराफ बाजार आणि फरशी पुलावरून मार्गस्थ होतो तेव्हा अवघी नगरी विठ्ठलमय होते. रथ फरशी पुलावर आल्यावर रंगबिरंगी फटाके, रॉकेट यांची आतषबाजी नयनरम्य असते. यानंतर वैशाख शुद्ध पौर्णिमेस पालखी



निघते. पहाटे पाचच्या सुमारास वाडी संस्थानातून निघालेली पालखी दुपारी चारच्या सुमारास पुनश्च जागेवर येते. पालखीच्या दुसऱ्या दिवशी गोपाळकाल्याच्या कीर्तनाने यात्रेची मुख्य सांगता होते.

या यात्रेतील खाद्याची मेजवानी आणि उन्हाळ्याची मजा अवर्णनीय आहे. यात्रेच्या खाऊमध्ये गुळाच्या जिलेबीचा दरवळ सर्वत्र असतोच. पण अमळनेरच्या यात्रेचे खरे वैशिष्ट्य म्हणजे टरबूज. उन्हाचा तडाखा कमी करणारे, आरोग्यास हितकारक आणि खिशाला परवडणारे हे 'काळीशार पाठ' असलेले टरबूज संपूर्ण कुटुंब मिळून तृप्तीचा ढेकर येईपर्यंत खातात. रात्री वाळवंटात कोणतेही अंथरुण न टाकता केवळ निसर्गाच्या कुशीत लागणारी 'समाधी'सारखी झोप ही या यात्रेची खास अनुभूती आहे.

रथ आटोपल्यानंतर चार-पाच दिवसांनंतरच्या यात्रेस गमतीने 'बाशी यात्रा' म्हणतात. मुख्य सोहळा संपल्यानंतर सुरू होते ती 'बाशी यात्रा'. उशिरा आलेले पाहुणे आणि स्थानिक नागरिक घरून आणलेल्या दशम्या, ठेचा, भाकरी आणि खिचडीचा डबा नदीपात्रात बसून आनंदाने खातात.

सुरक्षेच्या कारणास्तव आता वेळेची मर्यादा असली, तरी पूर्वी पहाटे चारवाजेपर्यंत चालणारी ही यात्रा आजही तितकीच चैतन्यमय आहे. व्यापार आणि मनोरंजन यांची सुंदर सांगड घालणारी मोठ्या उलाढालींची ही यात्रा असते. यात्रेत केवळ खेळणीच नाही, तर पोळपाट-लाटणे, चाटू, गाळणी यांसारख्या संसारोपयोगी वस्तूंचीही मोठी उलाढाल होते. आकाशात झेपावणारे पाळणे, 'मौत का कुवा' आणि नावीन्यपूर्ण वस्तूंची दुकाने यांनी नदीपात्र दोन्ही तीरांपर्यंत गजबजलेले असते. नोकरी-व्यवसायानिमित्त बाहेर असलेले अमळनेरकर आवर्जून घरी परततात. ज्यामुळे या यात्रेला एका मोठ्या कौटुंबिक संमेलनाचे स्वरूप प्राप्त होते.

थोडक्यात सांगायचे तर अमळनेरची यात्रा म्हणजे सर्वधर्मीयांच्या एकतेचे, परंपरेच्या अभिमानाचे आणि कडक उन्हाळ्यात मनाला शांती देणारे एक आनंदी पर्व आहे.

**- धनंजय सोनार,**
सामाजिक कार्यकर्ते, अमळनेर.

# लडगावला लग्नसोहळ्यासाठी जाणारी पिकअप व्हॅन उलटली; ११ जण जखमी

## जैतपीरमधील घटना; सहा जखमी उपचारार्थ धुळ्याला रवाना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिंदखेडा व शिरपूर या तालुक्यांतील वैजापूर, लोण-मुडी व बेटावद, जोयदा, माळीच येथील वऱ्हाडींना घेऊन तालुक्यातील लडगाव येथे लग्नसोहळ्यासाठी जाणारी पिकअप व्हॅन (एमएच १५-जीव्ही ७२९४) जैतपीर येथे वळणाजवळ उलटल्याने ११ जण जखमी झाल्याची घटना शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास घडली. यातील काहींना अमळनेर ग्रामीण रुग्णालय तर ६ जखमींना गावकऱ्यांच्या मदतीने धुळे येथे उपचारार्थ रवाना करण्यात आले.

सदर घटना जैतपीरमधील वळणाजवळील गतिरोधकाचा चालकास अंदाज न आल्याने हनुमान मंदिराला धडक बसल्याने वळणाजवळ घडल्याचे गावकऱ्यांकडून सांगितले जात आहे. मात्र, या घटनेची पोलिसांत कोणतीही नोंद झालेली नाही.

गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार शिंदखेडा तालुक्यातील वैजापूर, लोण-मुडी व बेटावद, जोयदा, माळीच येथील सुमारे २० ते २५ वऱ्हाडींना घेऊन पिकअप व्हॅन रात्री साडेनऊच्या सुमारास जैतपीर मार्गावरून लडगाव (ता. अमळनेर) येथे जात होती. मात्र, गतिरोधकाचा अंदाज न आल्याने पिकअप व्हॅनचा वेग नियंत्रणात आणणे चालकाला शक्य झाले नाही. त्यामुळे सदर पिकअप व्हॅन जैतपीरमधील हनुमान मंदिराच्या ओट्याला धडकून ती उलटल्याने त्यातील प्रवासी खाली कोसळले. त्यात काही जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेचे वृत्त कळताच गावकरी, पोलीसपाटील गोविंदा पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक जिभाऊ पाटील, भरत गायकवाड यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी भेट दिली. मात्र, या घटनेची पोलिसांत नोंद नाही.



*अमळनेर : लडगाव येथे लग्नसोहळ्यासाठी शुक्रवार, दि. ३ एप्रिल रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास जैतपीर येथे वळणाजवळ उलटलेली हीच ती पिकअप व्हॅन व वऱ्हाडी.*

### जखमींची नावे अशी

अंकुश भगवान बागूल (वय २०, रा. वैजापूर), राकेश प्रकाश मोरे (वय २०, रा. वैजापूर), बादल गुलाब भिल (वय १९, रा. मुडी), संजय बापू मोरे (वय २२), गणेश ताराचंद भिल (वय २१, रा. वैजापूर), मेलसिंग जयसिंग कुवर (वय २२, रा. वैजापूर, सर्व ता. शिंदखेडा) यांना हात, पाय, पाठ आणि डोक्याला गंभीर इजा झाल्याने धुळ्याला रवाना करण्यात आले, तर विजय दिलीप पवार (वय २२), राकेश सुखराम भिल (वय २३), रोहित भिल (वय १८, तिघे रा. वैजापूर, ता. शिंदखेडा), नागेश मंगल भिल (वय २०, रा. जोयदा, ता. शिरपूर), तर सनी श्याम भिल (वय १८, रा. माळीच, ता. शिरपूर) यांना अमळनेर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## ढेकू रोडवर घरफोडी; दागिन्यांसह रोकड लंपास

**पान १ वर :** रुपये रोख असे जवळपास एकूण ६४ हजार रुपयांचे दागिने चोरून नेल्याचे निष्पन्न झाले. याबाबत वैशालीताई वाघ यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हवालदार विनोद सोनवणे पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पोलिसांना घटनास्थळी पाठविले असता या भागातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चार चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्या आहेत.

## दत्तशिखर देवस्थानचे ३१ वे महंत मधुसूदनजी महाराज यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : माहूर गडाच्या पवित्र भूमीत भगवान दत्तात्रय यांच्या गादीवर ३१ वे महंत म्हणून विराजमान असलेले, अध्यात्म, सेवा आणि परंपरेचे जीवंत प्रतीक म्हणून ओळखले जाणारे श्री मधुसूदनजी भारती (मालक) महाराज यांचे शनिवार, दि. ४ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच यवतमाळ (जि. नांदेड) परिसरात तसेच भक्तपरिवारात शोककळा पसरली आहे.

श्री मधुसूदन महाराज यांनी आयुष्यभर दत्तभक्ती, धर्म संवर्धन आणि समाजसेवेसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या साध्या, संयमी आणि सेवाभावी जीवनामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आदराचे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असंख्य भक्तांना



आध्यात्मिक दिशा मिळाली. माहूरगड व दत्तशिखर यांची परंपरा जपण्यात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या जाण्याने केवळ संस्थेचेच नव्हे, तर संपूर्ण भक्तपरिवाराचे मोठे नुकसान झाले आहे. महाराजांच्या पार्थिवावर आज रविवार, दि. ५ एप्रिल रोजी धार्मिक विधींनुसार दुपारी ३ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत आत्म्यास सद्गती लाभो आणि त्यांच्या कुटुंबीयांना व भक्तगणांना हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर शक्ती देवो. **दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

## 'उधना-मालदा टाऊन' विशेष रेल्वेगाड्या धावणार खानदेशातील 'या' स्थानकांवर थांबा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : विविध वर्गांच्या वार्षिक परीक्षा उरकल्यानंतर उन्हाळी सुट्यांच्या पार्श्वभूमीवर प्रवासी गर्दी लक्षात घेऊन पश्चिम रेल्वे प्रशासनाने उधना (गुजरात) ते मालदा टाऊन (पश्चिम बंगाल) दरम्यान साप्ताहिक विशेष गाड्या सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे खानदेशातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे. रेल्वे प्रशासनाने जाहीर केल्यानुसार ०९०३३ उधना-मालदा टाऊन साप्ताहिक विशेष गाडी ४ एप्रिल ते २३ जुलै २०२६ या कालावधीत दर गुरुवारी धावेल. ही गाडी उधना स्थानकावरून रात्री ११ वाजता सुटून दोन दिवसांच्या प्रवासानंतर शनिवारी सकाळी ११ वाजता मालदा टाऊन येथे पोहोचेल. परतीच्या दिशेने ०९०३४ मालदा टाऊन-उधना साप्ताहिक विशेष गाडी १२ एप्रिल ते २६ जुलै २०२६ या कालावधीत दर रविवारी धावेल. ही गाडी मालदा टाऊन येथून सकाळी ९.३० वाजता सुटून मंगळवारी पहाटे ०१.२० वाजता उधना येथे पोहोचेल.

ही विशेष गाडी नंदुरबार, भुसावळ, खंडवा, इटारसी, जबलपूर, कटनी, सतना, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, पाटणा, बख्तियारपूर, मोकामा, किऊल, अभयपूर, जमालपूर, सुलतानगंज, भागलपूर, कहलगाव, साहिबगंज आदी स्थानकांवर थांबेल. आरक्षण व इतर तपशिलांसाठी प्रवाशांनी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

### उधना-जयनगर अनारक्षित गाड्या

पश्चिम रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी उधना आणि जयनगर दरम्यान देखील अनारक्षित विशेष गाड्या चालवणार आहे. ०९०६१ उधना-जयनगर ही अनारक्षित आठवड्यातून एक दिवस रविवारी उधनाहून पहाटे ०१.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०२.३० वाजता पोहोचेल. याशिवाय ०९०६२ जयनगर-उधना ही अनारक्षित विशेष गाडी ६ ते १३ एप्रिल २०२६ या कालावधीत आठवड्यातून एक दिवस सोमवारी ०५.३० वाजता जयनगरहून सुटेल आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.१५ वाजता उधना येथे पोहोचेल.

# खानदेशातील संस्कृती टिकविण्यासाठी आखाजी महोत्सव : शरद धनगर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खानदेशातील ग्रामीण संस्कृती टिकविण्यासाठी आखाजी महोत्सव एक वरदान ठरणारा आहे. मात्र, काळाच्या ओघात आखाजीची गाणी, झोका, लोकगीते लुप्त होत चालल्याचे दिसते. त्यामुळे या संस्कृतीच्या पारंपरिकतेला टिकविण्यासाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन खानदेश साहित्य संघाचे जळगाव जिल्हाध्यक्ष तथा प्रसिद्ध गझलकार शरद धनगर यांनी केले.

येथील प्रताप महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या खानदेश साहित्य संघाच्या जिल्हा व तालुका पदाधिकारी व सदस्यांच्या विशेष बैठकीत ते बोलत होते. जिल्हा सचिव उमेश काटे, जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर, जिल्हा कार्याध्यक्ष वाल्मीक मराठे-पाटील, साहित्यिक प्रा. डॉ. रमेश माने, पूज्य साने गुरुजी शिक्षक संघाचे राज्य कार्याध्यक्ष डॉ. कुणाल पवार, तालुकाध्यक्षा सुनीताताई पाटील आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सुरूवातीला इतिहास संशोधक स्व. डॉ जयसिंगराव पवार, पत्रकार स्व. योगेश महाजन यांच्यासह ज्ञात-अज्ञात साहित्यिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त राजू बाविस्कर यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांत नावलौकिक मिळविलेल्या व्यक्तींचा सन्मानही करण्यात आला. यात प्रदीप कंखरे, डॉ. कुणाल पवार, उमेश काटे, मनोहर नेरकर, दत्तात्रय सोनवणे, सीमाताई पाटील, पूजाताई पाटील, सुदर्शनाताई पाटील, ज्ञानेश्रीताई पाटील, शोभाताई शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

बैठकीत यावर्षी खानदेश साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. सदाशिव सूर्यवंशी यांच्या निर्देशानुसार दरवर्षी अहिराणी लोकवाङ्मय दिन साजरा करण्यात येईल. तसेच यंदा अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर 'आखाजी महोत्सव' साजरा करण्यात येणार आहे. यात गौराईसारखे सण पुनर्जीवित करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्यासह विविध विषयांवर उपस्थितांत चर्चा झाली. याप्रसंगी रत्नाकर पाटील, रामेश्वर भदाणे, अशोक पाटील, निरंजन पेंढारे, गोपाल हडपे, दत्तात्रय सोनवणे, छायाताई ईसे, भावनाताई पाटील, रेखाताई मराठे आदी उपस्थित होते.



*अमळनेर : खानदेश साहित्य संघाची नुकतीच प्रताप महाविद्यालयात विशेष बैठक झाली. यावेळी उपस्थित खानदेश साहित्य संघाचे जळगाव जिल्हाध्यक्ष तथा प्रसिद्ध गझलकार शरद धनगर, जिल्हा सचिव उमेश काटे, जिल्हा उपाध्यक्ष डी. ए. धनगर, जिल्हा कार्याध्यक्ष वाल्मीक मराठे-पाटील, साहित्यिक प्रा. डॉ. रमेश माने, पूज्य साने गुरुजी शिक्षक संघाचे राज्य कार्याध्यक्ष डॉ. कुणाल पवार, तालुकाध्यक्षा सुनीताताई पाटील आदी.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# स्वयंअभ्यासामुळेच ‘आयएएस’!

## दुसऱ्या प्रयत्नात मिळविले विशाल सारस्वतने यश




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विशाल सारस्वत यांनी कोणतेही कोचिंग न घेता स्वयंअभ्यासातून यूपीएससीमध्ये ५९१ वा क्रमांक मिळविला. त्यांनी सुरूवातीला स्वतःच्या ताकद व कमकुवतपणाचे मूल्यांकन करून स्पष्ट रणनीती तयार केली.

यूपीएससी सिव्हिल सर्व्हिसेस परीक्षा ही देशातील सर्वांत कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेची तयारी करताना बहुतांश उमेदवारांच्या मनात एकच प्रश्न असतो, की यश मिळविण्यासाठी कोचिंग आवश्यक आहे का? या प्रश्नाचे उत्तर देणारी प्रेरणादायी कथा म्हणजे विशाल सारस्वत यांची. त्यांनी कोणतेही कोचिंग न घेता स्वतःच्या अभ्यासाच्या जोरावर दुसऱ्या प्रयत्नात ५९१ वा क्रमांक मिळवत यश संपादन केले.

उत्तर प्रदेशातील मथुरा जिल्ह्यातील विशाल यांनी पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर यूपीएससीची तयारी करण्याचा निर्णय घेतला. सुरूवातीलाच त्यांनी स्वतःच्या क्षमतांचे बारकाईने मूल्यांकन केले. आपली ताकद आणि कमकुवतपणा ओळखून त्यांनी त्यानुसार अभ्यासाची स्पष्ट रणनीती तयार केली. त्यांच्या मते– योग्य नियोजन हेच यशाचे पहिले पाऊल आहे.

विशाल यांनी अभ्यासक्रमावर आधारित निवडक पुस्तके निवडली आणि त्यावरच लक्ष केंद्रित केले. त्यांनी एक ठोस वेळापत्रक तयार करून त्याचे काटेकोर पालन केले. इंटरनेटचा योग्य वापर करून त्यांनी विविध विषयांची सखोल माहिती मिळविली. त्यांचे म्हणणे आहे, की जर उमेदवाराकडे योग्य मार्गदर्शन आणि साधने असतील, तर कोचिंगशिवायही तयारी करणे शक्य आहे. मात्र, आवश्यक असल्यास कोचिंग घेण्यात काहीच गैर नाही.

यूपीएससीसारख्या कठीण परीक्षेसाठी मानसिक तयारीही तितकीच महत्त्वाची असल्याचे विशाल सांगतात. तयारीच्या काळात अनेक अडचणी येतात, पण त्यावेळी खचून न जाता सातत्य ठेवणे गरजेचे आहे. त्यांनी मूलभूत संकल्पना स्पष्ट करण्यासाठी एनसीईआरटी पुस्तकांचा आधार घेतला आणि नियमित पुनरावृत्तीवर भर दिला. याशिवाय, उत्तर लेखनाचा सराव आणि सकारात्मक दृष्टिकोन या दोन गोष्टी त्यांच्या यशामागील महत्त्वाचे घटक ठरले. कठोर परिश्रम, योग्य रणनीती आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर विशाल यांनी आपले ध्येय गाठले. त्यांची ही कथा अनेक यूपीएससी इच्छुकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# वैभवने ‘या’ गोष्टीपासून दूर राहावे!

## सिक्सर किंग युवराज सिंगचा वैभव सूर्यवंशीला मोलाचा सल्ला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयपीएल २०२६ स्पर्धेत एकच नाव चर्चेत आहे, ते म्हणजे वैभव सूर्यवंशी. वयाच्या १३ व्या वर्षी आयपीएलमध्ये बोली लागली, १४ व्या वर्षी पदार्पणाची संधी मिळाली आणि पहिल्याच हंगामात त्याने वेगवान शतक झळकावले. आयपीएल २०२६ स्पर्धेतील पहिल्या सामन्यातही त्याच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. चेन्नई सुपर किंग्ज संघाविरूद्ध झालेल्या पहिल्याच सामन्यात त्याने १५ चेंडूंत वेगवान अर्धशतक झळकावले. दरम्यान, भारताचा माजी फलंदाज युवराज सिंगने त्याच्या फलंदाजीचे तोंडभरून कौतुक केले आहे. यासह १५ वर्षीय फलंदाजाला मोलाचा सल्ला देखील दिला आहे.



युवराज सिंगने काही दिवसांपूर्वीच १५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. त्यामुळे तो भारताच्या वरिष्ठ संघात खेळण्यासाठी पात्र ठरला आहे. त्यामुळे अनेक दिग्गजांनी अशी मागणी केली आहे, की त्याला भारतीय टी-२० संघात स्थान मिळायला हवे. युवराज सिंगला देखील असेच वाटते, की तो लवकरच भारतीय संघासाठी खेळताना दिसू शकतो. त्याच्याकडे ती क्षमता आहे. वैभवचे कौतुक करताना युवराजने त्याला मोलाचा सल्ला देखील दिला आहे.

वैभवचे कौतुक करताना युवराज सिंग म्हणाला, की ‘वैभवबद्दलची सर्वांत खास गोष्ट म्हणजे त्याच्या बॅटचा वेग. त्याच्या बॅटचा वेग अतिशय वेगवान आहे. खरे सांगू, तर मी फलंदाजी करत असताना, माझी बॅटसुद्धा इतक्या वेगाने येत नव्हती. मी खूप कमी खेळाडूंना या गतीने फलंदाजी करताना पाहिले आहे. मला त्याच्याबद्दल सर्वांत आवडलेली गोष्ट म्हणजे त्याने चांगल्या चेंडूवरही ऑफ साईडला षटकार मारले आहेत. यावरून तो किती टॅलेंटेड आहे हे दिसून येते.’ मोलाचा सल्ला देत युवराज म्हणाला, की ‘वैभवने आपले पाय जमिनीवर ठेवणे गरजेचे आहे. यासह त्याने मन शांत ठेवणे देखील गरजेचे आहे.’

### पहिल्याच सामन्यात वेगवान अर्धशतक

राजस्थान रॉयल्सचा पहिला सामना चेन्नई सुपर किंग्ज संघाविरूद्ध पार पडला. या सामन्यात राजस्थान रॉयल्सचा संघ १२८ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आला होता. या धावांचा पाठलाग करताना वैभव सूर्यवंशीने अवघ्या १५ चेंडूत वेगवान अर्धशतक झळकावले. तो १७ चेंडूत ५२ धावांची खेळी करून माघारी परतला. या खेळीदरम्यान त्याने ४ चौकार आणि ५ षटकार मारले. राजस्थान रॉयल्सने १२८ धावांचे आव्हान अवघ्या १२.१ षटकांत पूर्ण केले होते.



# ‘आइसमैन’ : विम हॉफ



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विम हॉफ का जन्म १९५९ में नीदरलैंड में हुआ था। जब वे १७ साल के थे, तो एक दिन बर्फीली सर्दी में एक पार्क में टहल रहे थे। अचानक उनके मन में बर्फीले पानी में उतरने की एक अजीब सी इच्छा जगी। उन्होंने अपने कपड़े उतारे और जमी हुई नहर के पानी में डुबकी लगा दी। उन्हें डरने या कांपने के बजाय एक अजीब सी शांति और ताकत महसूस हुई। यहीं से उनके ‘आइसमैन’ बनने की शुरुआत हुई।

### १) सबसे बड़ा दुख और बदलाव

विम एक सामान्य जीवन जी रहे थे, उनकी शादी हुई और चार बच्चे थे। लेकिन १९९५ में एक भयानक मोड़ आयाउनकी पत्नी ओलैया ने मानसिक बीमारी के कारण आत्महत्या कर ली। विम पूरी तरह टूट चुके थे। अपने दुख और अकेलेपन से लड़ने के लिए उन्होंने फिर से उसी बर्फीले पानी का सहारा लिया। उन्होंने पाया कि जब वे कड़कड़ाती ठंड में होते हैं, तो उनका दिमाग शांत हो जाता है और वे दर्द भूल जाते हैं।

### २) दुनिया के लिए ‘पागल’ और ‘अजूबा’

लोग उन्हें पागल समझते थे जब वे बर्फीली झीलों में घंटों तैरते थे। लेकिन विम ने इसे अपनी शक्ति बना लिया। उन्होंने अपनी सांस लेने की तकनीक विकसित की।

### ३) उन्होंने दुनिया को चौंकाना शुरू किया

वे बर्फ के टब में घंटों बैठे रहे। सिर्फ शॉर्ट्स पहनकर दुनिया के सबसे ऊंचे पहाड़ों पर चढ़ गए। खून जमा देने वाले पानी में रिकॉर्ड बनाया।

### ४) विज्ञान को चुनौती

जब डॉक्टरों ने कहा कि यह नामुमकिन है, तो विम ने खुद को लैब में टेस्ट करवाया। उन्होंने साबित किया कि वे अपनी सांसों के जरिए अपने शरीर के अंदरूनी तापमान और इम्यून सिस्टम को कंट्रोल कर सकते हैं। उन्होंने दिखाया कि इंसान का मन शरीर से कहीं ज्यादा ताकतवर है।

### ५) वर्तमान समय (विरासत)

आज विम हॉफ पूरी दुनिया को यह सिखा रहे हैं कि हम सब अपने भीतर की बीमारियों और तनाव को कैसे हरा सकते हैं। वे अभी भी बर्फीले पानी में जाते हैं और पूरी तरह फिट हैं।

# करिअर ३८ वर्षांचेच राहिले; गाणी २० हजारांवर गायिली

## ‘मेलडी क्वीन’ जिला आता ऐकूच येत नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या काही महिन्यांपासून ही प्रसिद्ध गायिका संगीत जगतापासून दूर दूर आहे. नुकतेच एका मुलाखतीत तिने यामागील कारण सांगितले आहे. जे धक्कादायक आहे.

संगीत क्षेत्रातील करिअरची तिची ३८ वर्षे. इतक्या वर्षांत तिने हिंदी आणि इतर भाषांमध्ये अशा २० हजारांहून अधिक गाण्यांना आपला आवाज दिला. पण गेल्या काही महिन्यांपासून हा आवाज ऐकू येईना. ती बऱ्याच काळापासून इंडस्ट्रीत असल्याने नवीन गाण्यांमध्ये तिची अनुपस्थिती स्पष्टपणे जाणवत आहे. गेल्या काही महिन्यांपासून ही प्रसिद्ध गायिका संगीत जगतापासून दूर दूर आहे.

२०२४ मध्ये तिने एका फिल्मसाठी शेवटचे रेकॉर्डिंग केले. त्यानंतर कोणत्याही नवीन गाण्याला तिने आपला आवाज दिला नाही. अखेर या गायिकेने यामागील कारणाचा खुलासा केला आहे. तिला श्रवणक्षमतेशी संबंधित गंभीर आजार झाला आहे. ज्यामुळे तिला ऐकू येत नाही. २०२४ मध्ये तिला तिच्या या आजाराबद्दल समजले.



तेव्हापासून संगीतापासून काही काळ दूर राहण्याचा निर्णय तिने घेतला.

गायिकेने तेव्हा सोशल मीडियावर पोस्ट करत आपल्यावर उपचार सुरू असल्याची माहिती दिली होती. तसेच तिने आपल्या चाहत्यांना या काळात तिच्यासाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले होते.

आपल्या अनुभवानंतर श्रवणशक्ती कमी होणे किती गंभीर असू शकते याबद्दल तिने चाहत्यांना सावध केले. तिने लोकांना गोंगाट आणि विशेषतः हेडफोन वापरताना आपल्या कानांची काळजी घेण्याचा, मोठ्या आवाजात संगीत न ऐकण्याचा सल्ला दिला होता नुकत्याच एका मुलाखतीत गायिकेने अजूनही आपल्याला ऐकण्यात समस्या येत असल्याचे सांगितले. ‘कम्पोझर्स कधी-कधी आपल्याशी संपर्क करतात, पण मी आता ते करू शकत नाही. नवीन म्युझिक प्रोजेक्ट्स पूर्ण करू शकत नाहीये’, असे ती म्हणाली.

ही गायिका आहे अल्का याज्ञिक. जिने ‘नरम कालजा’ हे शेवटचे गाणे गयिले होते. इम्तियाज अली यांच्या ‘अमर सिंग चमकिला’ फिल्ममधील हे गाणे जे ए. आर. रहमान यांनी संगीतबद्ध केले होते.

# मस्तानी खरोखर कोथरूडच्या बागेत राहत होती का?

**प्रश्न :** मस्तानी खरोखरच कोथरूडच्या बागेत राहत होत्या का, हा प्रश्न अनेकांना पडतो.
**उत्सुकता** – इतिहासप्रेमींमध्ये या गोष्टीबद्दल नेहमीच चर्चा रंगत असते.
**कथा** – काहीजण सांगतात की मस्तानींचा कोथरूडशी खास संबंध होता.
**शंका** – पण या दाव्यांमागे ठोस पुरावे आहेत का, हा मोठा प्रश्न आहे.
**वास्तव** – प्रत्यक्षात मस्तानी कधीही कोथरूडच्या बागेत राहिल्याचे पुरावे नाहीत.
**कारण** – कारण थोरल्या बाजीरावांच्या काळात कोथरूडची बाग अस्तित्वातच नव्हती.
**इतिहास** – त्या काळातील नोंदींमध्ये कोथरूड बागेचा उल्लेख आढळत नाही.
**मालकी** – कोथरूडची बाग ही सरदार हरिपंत फडक्यांची मानली जाते.
**पुरावे** – काही पत्रांमध्ये बागेचा उल्लेख आहे. पण तो नंतरच्या काळातील आहे.
**काळ** – हे उल्लेख दुसऱ्या बाजीरावांच्या काळाशी संबंधित आहेत.
**वैशिष्ट्य** – त्यावेळी तेथे आरसेमहाल आणि जलमंदिर होते.
**वास्तू** – दुसऱ्या बाजीरावांचा राहता वाडाही त्या परिसरात होता.
**निर्मिती** – त्यामुळे ही बाग नानासाहेब पेशव्यांनंतर तयार झाली असावी.
**माहिती** – ही ऐतिहासिक माहिती शंतनू परांजपे यांनीही मांडली आहे.
**रिव्हील** – म्हणजेच, मस्तानी आणि कोथरूड बाग यांचा संबंध हा केवळ गैरसमज आहे, इतिहास नाही.
सौंदर्यवती मस्तानी दिसायची तरी कशी? तिची ‘ही’ चित्रे कितपत खरी?

# ‘अमिताभसोबत सीन करताना झाले होते अवघड’

## झीनत अमान यांनी सांगितला डॉन सिनेमातला बीटीएस किस्सा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बॉलिवूडच्या गाजलेल्या सिनेमांपैकी एक म्हणजे अमिताभ बच्चन यांचा डॉन सिनेमा. आता याच सिनेमातील अभिनेत्री झीनत अमान यांनी एक खास किस्सा शेअर केलाय. गेल्या काही वर्षांत गाजलेल्या सिनेमातील बीटीएस अर्थात पडद्यामागे घडलेल्या गोष्टी चर्चेत येत आहे. एखादा सिनेमा शूट करत असताना पडद्यामागे बऱ्याच चांगल्या, वाईट, मजेशीर गोष्टीही अनेकदा घडत असतात. आता अनेक जुने कलाकार त्यांच्या या सेटवरच्या काही आठवणी शेअर करताना दिसतात.

आता बॉलिवूडमधील ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान यांनी एक किस्सा सांगितला आहे.





बॉलिवूड इंडस्ट्रीतील ज्येष्ठ अभिनेत्री झीनत अमान सोशल मीडियावर कमालीच्या सक्रिय असतात. आपल्या अभिनय कारकिर्दीतील अनेक किस्से त्या चाहत्यांसोबत शेअर करत असतात. नुकतीच त्यांनी १९७८ मधील ‘डॉन’ या गाजलेल्या कल्ट क्लासिक चित्रपटाच्या शूटिंगदरम्यानची एक आठवण शेअर केली आहे. यात त्यांनी सांगितले, की एका सीनमध्ये अमिताभ बच्चन यांना व्हीलचेअरवर बसवून ढकलणे त्यांच्यासाठी किती आव्हानात्मक होते.

### काय होता तो ‘डॉन’मधील सीन?

‘डॉन’ चित्रपटातील एका महत्त्वाच्या सीनमध्ये झीनत अमान (रोमा) एका नर्सचे रूप घेऊन बेशुद्ध असलेल्या अमिताभ बच्चन (डॉन) यांना हॉस्पिटलमधून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन बाहेर काढतात. ह सीन पडद्यावर पाहताना प्रेक्षकांना जितक थरारक आणि सहज वाटतो, तितकाच तो शूट करताना झीनत अमान यांच्यासाठी कठीण ठरला होता.

झीनत यांनी आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये या सीनचा बीटीएस अनुभव सांगितला. सिनेमात रोमा ही अत्यंत चाणाक्ष आणि धाडसी दाखवली आहे. पण खरे तर सेटवर तो सीन शूट करणे माझ्यासाठी नक्कीच सोपे नव्हते. ती जुन्या पद्धतीची व्हीलचेअर आणि त्यात अमिताभ बच्चन यांचे वजन. त्यांना ढकलणे माझ्यासाठी खूपच कठीण जात होते. मला कॅमेऱ्यासमोर चेहऱ्यावर कोणतेही भाव न आणता शांत राहायचे होते, पण प्रत्यक्षात मी माझी सर्व ताकद लावून ती व्हीलचेअर ढकलत होते. असे झीनत यांनी सांगितले.

इतकच नाही तर झीनत यांनी पुढे सांगितले, की या चित्रपटाच्या टीमसोबत त्यांनी आधीही काम केले असल्याने त्या सेटवर खूप कम्फर्टेबल होत्या. त्यांना ‘रोमा’ हे पात्र साकारायला खूप आवडले. कारण ती एक स्वावलंबी आणि सशक्त स्त्री होती.

शांत – चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोळा रोड, धुळे




# संकष्टी चतुर्थी व्रत कधी व कसे सुरू झाले?

## जाणून घ्या पौराणिक कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संकष्टी चतुर्थीचे व्रत गणपती बाप्पांना समर्पित आहे. या दिवशी मनोभावे पूजा-अर्चा केल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व अडथळे आणि संकट दूर होतात, अशी श्रद्धा आहे. चतुर्थीच्या व्रताची सुरूवात कधी आणि कशी झाली, जाणून घेऊया.

हिंदू धर्मात भगवान श्रीगणेश यांना विघ्नहर्ता आणि बुद्धीचे देव मानले जाते. संकष्टी चतुर्थीचे व्रत हे गणपती बाप्पांना समर्पित असून, ते अत्यंत शुभ आणि फायदेशीर मानले जाते. हिंदू शास्त्रानुसार या दिवसाला विशेष महत्त्व आहे. हा दिवस भक्तांच्या जीवनातील सर्व संकटे आणि अडथळे दूर करतो. संकष्टीचा अर्थच 'संकट दूर करणारी' असा आहे. श्रद्धेनुसार ही परंपरा प्राचीन काळी सुरू झाली, जेव्हा देवदेवता देखील त्यांच्या कार्यांच्या यशस्वितेसाठी सर्वप्रथम गणपतीची पूजा करत असत. हा उपवास केवळ धार्मिकदृष्ट्याच महत्त्वाचा नाही, तर तो कठीण काळात मन शांत ठेवण्यास आणि संयम राखण्यासही प्रेरणा देतो.

### 'संकष्टी' या शब्दाचा अर्थ काय?

संकष्टी म्हणजे संकटांचा नाश करणारी. या दिवशी केलेल्या व्रतामुळे अडचणी दूर होतात, अशी श्रद्धा आहे.

### शास्त्रात संकष्टी चतुर्थीचे वर्णन

पुराणांमध्ये विशेषतः गणेश पुराण आणि मुद्गल पुराणात, संकष्टी चतुर्थीचे महत्त्व सविस्तरपणे सांगितले आहे. एका प्रचलित आख्यायिकेनुसार भगवान शिव आणि देवी पार्वती यांच्यात 'प्रथम कोण' यावरून झालेल्या वादविवादादरम्यान श्रीगणेशांनी विश्वाची प्रदक्षिणा करण्याऐवजी आपल्या आई-वडिलांची प्रदक्षिणा केली. त्यामुळे त्यांना प्रथम पूजनीय होण्याचा मान मिळाला. शास्त्रानुसार भगवान श्रीकृष्णांनी युधिष्ठिराला त्याच्या दुःखातून मुक्ती मिळविण्यासाठी हे व्रत पाळण्याचा सल्ला दिला होता. अशी देखील श्रद्धा आहे की जो कोणी या दिवशी पूर्ण भक्तीभावाने व्रत पाळतो त्याच्या जीवनातील सर्व इच्छा कोणत्याही अडथळ्याशिवाय पूर्ण होतात.



### व्रत पाळण्याची धार्मिक परंपरा

संकष्टी चतुर्थीच्या परंपरेत चंद्रदर्शनाला विशेष स्थान आहे. या दिवशी भक्त सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत उपवास करतात म्हणजेच पूर्ण दिवस उपवास केला जातो. गणपती बाप्पांना दुर्वा, मोदक आणि लाल फुले अर्पण केली जातात, जे गणपती बाप्पांचे विशेषण मानले जाते. सायंकाळी चंद्राची प्रार्थना केल्यानंतरच उपवास सोडला जातो. या विधीदरम्यान शांत मनाने ध्यान करणे आणि गणेश अथर्वशीर्षाचे पठण करणे अत्यंत लाभदायक आहे. परंपरेनुसार या दिवशी दानधर्माची कामे देखील केली पाहिजेत. ज्यामुळे घरात शांती आणि आनंद नांदेल. लोक आपली घरे दिव्यांनी सजवतात आणि भजन व कीर्तनाच्या माध्यमातून आपली भक्ती व्यक्त करतात. ज्यामुळे वातावरणात सकारात्मक ऊर्जा टिकून राहते.

### संकष्टी चतुर्थीला चंद्रदर्शन का महत्त्वाचे?

चंद्राला अर्घ्य दिल्यानंतरच उपवास पूर्ण मानला जातो. त्यामुळे चंद्रदर्शनाला विशेष महत्त्व आहे.

# पौर्णिमेस सत्यनारायण का करावा? काय आहे महत्त्व?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्म देण्याचे काम ब्रह्मदेव करत असतात. जन्म ते मृत्यूपर्यंत पालनपोषण करण्याची जबाबदारी भगवान विष्णूंवर आहे आणि मृत्यूनंतर भगवान शंकर यांची जबाबदारी असते म्हणून मेल्यानंतर मृतात्म्यांना मुक्ती देण्याचे कार्य भगवान शंकर यांच्या स्थानी असते. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर या ठिकाणी नारायण नागबली हा विधी केला जातो.

आर्थिक अडचणी येणे, अन्न चविष्ट न लागणे, अन्न खाऊन तृप्ती न होणे, महिनाभर पुरणारे धान्य महिनाभर न पुरता ते लवकर संपणे, घरात पैसा नको असलेल्या ठिकाणी खर्च करावा लागणे, पैसा घरात आला म्हणजे त्याला वाटा फुटून अनाठायी पैसा खर्च होणे.

सतत १२ पौर्णिमांनंतर त्या व्यक्तीचे वरील प्रश्न बऱ्याच अंशी सुटलेले असतात. बरेच चांगले अनुभव लोकांना आलेले दिसतात. याचे कारण आपण जी सत्यनारायण पूजा करतो ती धान्याची असते. जुनी मंडळी अशी म्हणतात, की घरचे धान्य सरत नाही व विकतचे धान्य पुरत नाही. कारण विकतचे आणलेले धान्य आपल्या घरी आल्यानंतर आपण ते खाल्ल्याने जाणकार मंडळी असे म्हणतात.

'ओकलेले खाल्ले तर एकवेळेस ते चालेल. परंतु टोकलेले खाऊ नये', 'जैसे खावे अन्न वैसे उपजे मन' या सर्व गोष्टी आपल्या कुटुंबावर वाईट परिणाम करू शकतात. घरातील माणसे एकविचाराने न राहणे, घरात अन्नधान्य, पैसा पुरेसा न पडणे या सर्व गोष्टींचे मूळ आपल्याला या ठिकाणी दिसून येते. म्हणून आपल्या पूर्वजांनी फार बारीक अभ्यास करून घरच्या घरी पौर्णिमेला सत्यनारायणची पूजा करण्याची प्रथा यासाठी घालून दिली आहे. आपल्या घरी असलेले अन्न व धन पालनपोषणाची जबाबदारी भगवान विष्णू यांच्याकडे असल्याने भगवान विष्णूंच्या अधिष्ठानात घरातील धान्य व पैशांचे सत्यनारायणाच्या पूजेच्या माध्यमातून जर आपण पूजन केले तर त्या पैशांचे आणि धान्याचे सर्व दोष नाहीसे होतात. तसेच तो पैसा धन, पैशांत पैसा टाकल्यास त्याला बरकत राहते. त्या ठिकाणी पवित्रता येऊन घरात सुख, शांती, आनंदी, प्रसन्न वातावरण राहण्यास सुरूवात होते.

### पूजा साहित्य

१ पाट, १ चौरंग, चौरंगाभोवती आब्याचे चार डहाळे, चौरंगावर अर्धा मीटर पांढरे कापड, ताह्मणात तांदूळ घेऊन त्यात बाळकृष्ण ठेवावा. तीन सुपाऱ्या विड्याच्या पानावर ठेवाव्यात (पहिली सुपारी गणपतीची, दुसरी कुलदेवतेची, तिसरी वरुणाची) वरील पद्धतीने मांडणी करून सर्वांची पंचोपचार पूजा करावी. नंतर रव्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवून सत्यनारायणाची पोथी वाचावी, पोथी वाचून झाल्यानंतर अन्नाचा नैवेद्य दाखवावा, आरती करून प्रसाद वाटावा. हा प्रसाद कुटुंबातील व्यक्तींनीच खावा. बाहेरच्या व्यक्तीला प्रसाद देऊ नये. नातेवाईकांना सुद्धा देऊ नये. यानंतर पूजेतील उरलेले गहू, तांदूळ त्या-त्या धान्यात टाकावे. यामुळे धान्याचे दोष नाहीसे होऊन ते पवित्र होतात.

**। श्री स्वामी समर्थ गुरुमाऊली ।**

# संकष्टी चतुर्थीचा उपवास चंद्रदर्शनानंतर का सोडतात?

## काय आहे यामागील शास्त्र?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संकष्टी चतुर्थीचे व्रत दर महिन्याला पाळले जाते. यावेळी भक्त दिवसभर उपवास करतात आणि चंद्रोदयानंतर उपवास सोडतात. चंद्रदर्शनानंतर उपवास सोडण्याचे शास्त्रीय कारण काय आहे ते जाणून घेऊया

हंदू धर्मात अनेक उपवास केले जातात. प्रत्येक उपवासाचे महत्त्व वेगळे सागण्यात आले आहे. प्रत्येक उपवास करण्याची पद्धतही भिन्न असते. महिन्याच्या कृष्ण चतुर्थीला संकष्टी चतुर्थीचे व्रत केले जाते. या दिवशी दिवसभर उपवास केल्यानंतर रात्री चंद्र पाहिल्यानंतर उपवास सोडण्याचे एक वेगळे महत्त्व आहे. धर्मशास्त्रात याबाबत एक आख्यायिका सांगितली आहे.

### कसा करावा उपवास?

संकष्टी चतुर्थीच्या व्रताच्या दिवशी दिवसभर उपवास करून चंद्रोदय झाल्यावर चंद्राला व गणपतीला महानैवेद्य दाखवावा. यावेळी मोदकाचा नैवेद्य दाखविण्याची पद्धत आहे. गणपती बाप्पांना मोदक प्रिय आहे. नैवेद्य दाखविल्यानंतर भोजन करावे. हे व्रत आमरण किंवा २१ वर्षे किंवा एक वर्ष असावा. व्रतराज या ग्रंथात या व्रताबाबत सांगितले आहे.

### काय आहे यामागील कथा?

एकदा गणपती बाप्पा उंदरावर बसून घाईघाईने जात असताना घसरले. तेव्हा त्यांना बघून चंद्र उपहासाने हासला. ते पाहून गणपती बाप्पांना चंद्राचा प्रचंड राग आला. त्या रागाच्या भरात गणपती बाप्पांनी चंद्राला शाप दिला, की आजपासून तुझे कुणी तोंड पाहणार नाही. जो कोणी पाहील त्यावर खोटा आळ येईल!' गणपतीचा हा शाप ऐकून चंद्र भयभीत झाला व क्षमा करून शाप मागे घ्या, अशी विनवणी करू लागला. गणपती बाप्पा ऐकत नाही हे चंद्राच्या लक्षात आले, तेव्हा चंद्राने मोठे तप करून गणपती बाप्पांना प्रसन्न करुन घेतले.



चंद्राच्या तपामुळे आणि सर्व देवांनी प्रार्थना केल्यामुळे गणपती बाप्पांनी चंद्राला शापातून मुक्त केले. पण वर्षातून एक दिवस 'भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच गणेश चतुर्थीच्या दिवशी' तुझे तोंड कुणी पाहणार नाही आणि जो कुणी पाहील त्यावर त्या वर्षी खोटा आळ येईल, असे सांगितले. त्यावर चंद्राने प्रार्थना केली, की जर कुणी चुकून गणेश चतुर्थीच्या दिवशी माझे तोंड पाहिले तर खोटा आळ येऊ नये म्हणून त्याने काय करावे? तेव्हो गणपती बाप्पांनी सांगितले, की त्याने संकष्टी चतुर्थी व्रत करावे, म्हणजे खोट्या आळातून त्याची मुक्तता होईल. गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्र पाहिल्यामुळे श्रीकृष्णावर स्यमंतक मणी चोरल्याचा खोटा आळ आला होता. तो आळ कृष्णाने 'संकष्टी चतुर्थी व्रत' केल्यामुळे गेला, अशी पौराणिक कथा आहे.

आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनी सर्वांनी करावयाचे हे एक साधे, सोपे पण शीघ्र फलदायी व्रत आहे. श्रावणातील संकष्टी चतुर्थी आणि मंगळवारी येणारी अंगारकी संकष्टी चतुर्थी विशेष फायदेशीर असते. चंद्राने तप करून गणपती बाप्पांना प्रसन्न करून घेतल्याने चंद्रदर्शनाचे महत्त्व आहे. प्रत्येकाने वर्षातून या दोन संकष्टी तरी अवश्य कराव्यात, असे शास्त्रात सांगितले आहे.

दरम्यान, भाद्रपद शुक्ल चतुर्थीला (गणेश चतुर्थी) चंद्रदर्शन झाल्यास खोटे आरोप होतात आणि नको ते संकट ओढवते, अशी पौराणिक कथा आहे. त्या कथेचा व संकष्टी चतुर्थीच्या दिवशी चंद्र बघून उपवास सोडण्याचा एक धार्मिक संबंध आहे. त्यामुळे शक्यतो उपवास करणाऱ्यांनी आणि न करणाऱ्यांनी चंद्रोदयानंतरच उपवास सोडावा. त्यामुळे उपवास फायदेशीर ठरतो.

# नैवेद्याच्या ताटात मीठ का वाढत नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक गाव व ठिकाणच्या वेगवेगळ्या चालीरीती, प्रथा, परंपरा असतात. त्या अनुषंगाने ताट वाढण्याचीही प्रथा, परंपरा असते. नैवेद्याच्या ताटात मीठ का वाढत नाही? याबाबतची माहिती जाणून घेऊया.



### नैवेद्याच्या ताटात मीठ का वाढत नाही?

धार्मिक दृष्टिकोनातून मीठ हे 'मीपणा' किंवा अहंकाराचे प्रतीक मानले जाते. जो देवासमोर नसावा, असे मानतात. तसेच 'खाल्ल्या मिठाला जागावे' या उक्तीप्रमाणे देवाला कर्माच्या ऋणात न अडकविण्यासाठी वेगळे मीठ वाढत नाही. व्यावहारिकदृष्ट्या नैवेद्य केळीच्या पानावर किंवा ताटात वाढताना पाण्यामुळे मीठ विरघळून ताट खराब होऊ शकते. म्हणून ते वाढणे टाळले जाते.

### मुख्य कारणे

**अहंकाराचे प्रतीक :** मीठ हे मिठाच्या रूपाने 'मी' म्हणजेच अहंकार दाखविते. जो देवासमोर अर्पण करू नये, अशी धारणा आहे.

**ऋणातून मुक्ती :** देवाला आपल्या कर्माचा न्यायनिवाडा करायचा असतो. त्यामुळे त्याला आपल्या ऋणात (मीठ वाढून ) अडकवू नये, असा सारासार विचार आहे.

**व्यावहारिक कारण (पाण्याचा अंश) :** नैवेद्य ओल्या पानावर (केळीचे पान / पत्रावळ ) वाढला जातो. जेथे मिठाला लगेच पाणी सुटून ते ताटात पसरते आणि ताट खराब होते. बाजूला वाढलेल्या पदार्थात मिक्स होऊन इतर पदार्थ खारट होऊ शकतात.

### महत्त्वाचे

पूर्णतः नैवेद्य परिपूर्ण असावा. त्यात वरून मीठ टाकण्याची गरजच पडू नये, अशीही श्रद्धा, भावना असते. तसेच कांदा आणि लसूण टाकून केलेला पदार्थ नैवेद्यात चालत नाही व वाढत नाहीत. असो.

# श्री हनुमानजींचा जन्मोत्सव केव्हा, कसा साजरा कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, विभीषण, कृप, परशुराम हे सप्त चिरंजीव आहेत.

**श्री हनुमानजींचा परिवार**
**वडील :** केसरी
**आई :** अंजनी
**अन्य नावे/नामांतरे :** हनुमंत, मारुती, बजरंग बली, आंजनेय.
**या अवताराची मुख्य देवता :** श्रीशिव

आपण दूरचित्रवाणीवरील अनेक मालिका पाहतो. त्यात शक्तीमानसारखे एखादे काल्पनिक पात्र दाखविले जाते. ते पाहून आपल्याला वाटते, की आपणही असे शक्तीमान व्हावे. अनेक मुले अशा पात्रांना खरे समजून तशी कृती करण्याचाही प्रयत्न करतात; पण हे सर्व खोटे आणि काल्पनिक असते. यापेक्षा आपल्या देवता पुष्कळ शक्तीमान आणि सर्वार्थाने आदर्श आहेत. मारुतीराया पुष्कळ शक्तीमान होते. त्यांनी केवळ एका हातावर द्रोणागिरी पर्वत उचलला, तसेच समुद्रावरून उड्डाण करून लंकेत प्रवेश केला. आपल्याला अशा सर्वशक्तीमान हनुमानजींसारखे व्हायला आवडेल की खोटे पात्र असलेल्या शक्तीमान आणि स्पायडरमॅनसारखे व्हावेसे वाटेल?

आपल्या मनात प्रश्न येतो, की हनुमानजी एवढे शक्तीमान कसे? याचे उत्तर म्हणजे हनुमानजींनी प्रभू श्रीरामचंद्रांची भक्ती केली. भक्तीनेच शक्ती मिळते. भक्ती केली तर आपणसुद्धा मारुतीरायांसारखे शक्तीमान होऊ. आपल्याला सर्वशक्तीमान आणि महापराक्रमी व्हावेसे वाटते ना? आपणही मारुतीरायांचा आदर्श समोर ठेवून राष्ट्र आणि धर्म यांचे रक्षण करण्यासाठी सिद्ध व्हायला हवे. आपण हनुमानजींच्या जयंती निमित्ताने सर्वशक्तीमान हनुमानजींचा जन्म आणि इतर माहिती समजून घेऊ, तसेच कोणत्या गुणांमुळे ते प्रभू श्रीरामचंद्रांचे आवडते आणि परमभक्त झाले, हेही पाहू.

**१) मारुतीरायांच्या जन्माचा** इतिहास आणि त्यांना 'हनुमान' नाव मिळण्याचे कारण

राजा दशरथ यांनी पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ केला होता. त्या यज्ञातून अग्नीदेव प्रसन्न झाले आणि त्यांनी दशरथांच्या राण्यांना पायस, म्हणजेच खिरीचा प्रसाद दिला. दशरथ राजांच्या राण्यांप्रमाणेच तपश्चर्या करणाऱ्या अंजनीला म्हणजे मारुतीरायांच्या आईंनाही हा प्रसाद मिळाला. त्यामुळे अंजनी यांना मारुतीरायांसारखा पुत्र लाभला. त्या दिवशी चैत्र पौर्णिमा होती. तो दिवस हनुमान जयंती म्हणून साजरा केला जातो. मारुतीरायांनी जन्मतःच उगवता सूर्य पाहिला आणि त्यांना ते फळ आहे, असे वाटून त्यांनी सूर्याच्या दिशेने उड्डाण केले. त्यावेळी सूर्याला गिळण्यासाठी राहू आला होता. इंद्रदेवाला मारुती राहूच आहे, असे वाटले आणि त्याने मारुतींच्या दिशेने वज्र फेकले. ते मारुतीरायांच्या हनुवटीला लागले आणि त्यांची हनुवटी छाटली गेली. तेव्हापासून त्यांना 'हनुमान' हे नाव पडले.

## काय आहे हनुमानजींचा महिमा? जाणून घ्या

**२) कार्य आणि वैशिष्ट्ये**

**२ अ)** महापराक्रमी : हनुमंतजींनी जंबू, माली, अक्ष, धूम्राक्ष, निकुंभ या मोठमोठ्या विरांचा नाश केला. त्यांनी रावणालासुद्धा बेशुद्ध केले. समुद्रावरून उड्डाण करून लंकादहन केले आणि द्रोणागिरी पर्वतही उचलून आणला. या सर्व गोष्टींवरून आपल्याला मारुतीराया किती महापराक्रमी होते, हे लक्षात येते.


नवनाथ दत्त मंदिर, सावनेर (जि. नागपूर)

**२ आ) निस्सीम भक्त :** मारुतीराया केवळ पराक्रमी नव्हते, तर श्रीरामांचे भक्तही होते. देवासाठी प्राण देण्याची त्यांची सिद्धता होती. ते सतत देवाचे नामस्मरण करत असत. देवाच्या नामातच शक्ती आहे, हे त्यांना ठाऊक होते. आपणही सतत नामस्मरण करून देवाचे भक्त होऊया अन् देवाची शक्ती मिळवूया. मारुतीरायांना देवाच्या सेवेपुढे सर्व तुच्छ वाटत असे. असा भक्तच देवाला आवडतो. आपणही त्यांच्यासारखे भक्त होण्याचा प्रयत्न करायला हवा.

**२ इ) अखंड साधना :** युद्ध चालू असताना मारुतीराया थोडा वेळ बाजूला जाऊन ध्यान लावे आणि प्रत्येक क्षणाला देवाचे स्मरण करत असे.

**२ ई) बुद्धीमान :** मारुतीरायांना सर्व व्याकरणसूत्रे ठाऊक होती. त्यांना अकरावा व्याकरणकार मानले जाते. ते एवढा बुद्धीमान कसे? जे भक्ती करतात, त्यांची बुद्धी सात्त्विक होते. आपणही मारुतीरायांसारखी भक्ती करून बुद्धीमान होऊया.

**२ उ) जितेंद्रिय :** मारुतीरायांचे आपल्या इंद्रियांवर नियंत्रण होते. ते माता सीता यांच्या शोधासाठी लंकेत गेले. तेथे त्यांनी राक्षस कुलातील अनेक महिला पाहिल्या; पण एकाही महिलेविषयी त्यांच्या मनात कोणताही वाईट विचार क्षणभरसुद्धा आला नाही; कारण त्यांनी आपल्या सर्व विकारांवर नियंत्रण मिळविले होते. देवाची भक्ती करणारा खरा भक्तच आपल्या विकारांवर, म्हणजेच वाईट विचारांवर नियंत्रण मिळवितो. तो विकारांच्या आहारी जात नाही. आपण पुष्कळ शिक्षण घेतो; पण आपले विकार जात नाहीत. याचे कारण आपण देवभक्त नाही.



**२ ऊ) भाषणकलेत निपुण** असणारे : मारुतीराया उत्तम वक्ते होते. त्यांनी रावणाच्या दरबारात भाषण केल्यावर सारा दरबार थक्क झाला.

वरील सर्व गुण आपल्यात येण्यासाठी आपण मारुतीयांना प्रार्थना करूया, की हे मारुतीराया, आम्हाला तुमच्यासारखी भक्ती करण्याची शक्ती आणि बुद्धी द्या. तुमचे सर्व गुण आमच्यात येण्यासाठी आमच्याकडून प्रयत्न होऊ द्या.

**३)** मारुतीरायांच्या मूर्तीचा रंग शेंदरी असण्याचे आणि त्यांना शेंदूर लावण्याचे कारण

**३ अ)** प्रभू श्रीरामचंद्रांवरील निस्सीम भक्तीचे प्रतीक म्हणून सर्वांगाला शेंदूर लावणे : मारुतीरायांचा रंग शेंदरी असण्याविषयी एक गोष्ट आहे. एकदा माता सीता यांनी स्नानानंतर कपाळाला शेंदूर लावला. तेव्हा हनुमानजींनी त्याचे कारण विचारले. माता सीता म्हणाल्या, की प्रभू श्रीरामांचे आयुष्य वाढावे म्हणून मी शेंदूर लावते. मारुतीराया श्रीरामांचे निस्सीम भक्त होते. ते म्हणाले, की माझ्या स्वामींचे आयुष्य याने वाढणार असेल, तर मी सर्व अंगालाच शेंदूर लावतो. असे म्हणून त्यांनी स्वतःच्या पूर्ण अंगाला शेंदूर लावला. हे प्रभू श्रीरामचंद्रांना समजल्यावर ते प्रसन्न झाले आणि म्हणाले, की मारुतीराया, तुमच्यासारखा माझा अन्य कुणीही भक्त नाही. तेव्हापासून मारुतीयांचा रंग शेंदरी आहे.

**३ आ)** मारुतीरायांना शेंदूर लावणे आणि तेल वाहणे : हनुमानजी द्रोणागिरी पर्वत घेऊन जात असताना भरताने त्यांना बाण मारला. तेव्हा त्यांच्या पायाला दुखापत झाली आणि ती शेंदूर आणि तेल लावल्यामुळे बरी झाली. त्यामुळे हनुमानजींना शेंदूर वाहतात आणि तेल लावतात.

**४) मारुतीरायांची रूपे**

**४ अ) प्रताप मारुती :** एका हातात द्रोणागिरी पर्वत आणि दुसऱ्या हातात गदा, असे याचे रूप असते. यातून मारुतीरायांची सर्वशक्तीमानता पाहावयास मिळते.

**४ आ) दासमारुती :** श्रीरामांपुढे हात जोडून उभा असलेले, मस्तक झुकलेले आणि शेपूट भूमीवर रुळलेले, असे त्यांचे रूप आहे. यातून हनुमानजी किती नम्र आहेत, हे आपण शिकायचे आहे.

**४ इ) वीरमारुती :** हा सतत लढण्याच्या पवित्र्यात उभा असतो. आपणही याच्यासारखे अन्यायाच्या विरोधात लढले पाहिजे. हनुमान जयंतीच्या निमित्ताने आपण निश्चय करूया की आम्ही अन्यायाविरुद्ध लढायला मारुतीरायांप्रमाणे सिद्ध राहू.

**४ ई) पंचमुखी मारुती :** आपण पुष्कळ ठिकाणी पंचमुखी मारुतीरायांच्या मूर्ती पाहतो. गरुड, वराह, हयग्रीव, सिंह आणि कपिमुख अशी मूर्तींची मुखे असतात. पंचमुखीचा अर्थ आहे पाच दिशांचे रक्षण करणारे. मारुती पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि ऊर्ध्व या पाच दिशांचे रक्षण करतात.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**